# इतिहासातील अंधारी भुयारं, तळघरं आणि त्यांतून जाणारी मुलं

**लेखक : प्रकाश कांत**

**इतिहासाचे धडे नेहमी राजे, त्यांच्या लढाया व राज्यकारभार यांनीच का भरलेले असतात? इतिहासात फक्त राजेच होते का, प्रजा नव्हती? कसे होते तेव्हाचे लोक, ते काय करत असतं? इतिहासाचे धडे याबद्दल काहीच का सांगत नाहीत? इतिहास शिकताना कायम समोर येणारे हे प्रश्न आहेत. प्रस्तुत लेखामध्ये प्रकाश कांत यांनी हेच प्रश्न विचारले आहेत. त्याच बरोबर इतिहास शिक्षणाच्या स्रोतांची ओळख, पुराव्यांमधून 'सत्या'चा निष्कर्ष काढणे, वगैरे आवश्यक पैलूंवर आपल्या शिक्षण क्षेत्रातील अनुभवांच्या द्वारे प्रकाश टाकला आहे.**

पारंपरिक इतिहासाचे शिक्षण आणि इतिहासाची पुस्तकं यांबद्दल नेहमीच असा आरोप केला जातो; आणि तो बऱ्यापैकी खरा असतो, की इतिहास म्हणजे नुसती राजे आणि नवाबांची नावं, त्यांच्या वंशावळी आणि त्यांच्या कारवाया यांचा लेखाजोखा असतो. राजे, नवाब, युद्धं, त्यांच्यातली हार-जीत, त्यांची राज्यं, साम्राज्यं, त्यांचा विस्तार, तिथली राज्यव्यवस्था; अशा गोष्टी आणि त्यांच्या तपशिलांनी भरलेला इतिहास साधारणपणे कंटाळवाणा असतो, आणि वरून तारखांचा भडीमार! प्रत्येक तारीख महत्त्वपूर्ण! प्रत्येक तारीख ऐतिहासिक! हे सगळं मिळून मुलांमध्ये इतिहासाबद्दल एक प्रकारचा कंटाळा आणि दहशत निर्माण होते.

## इतिहास लेखनाची विटंबना

पहिल्यापासूनच इतिहास राजसत्तांवर केंद्रित राहिलेला आहे. त्यातली लोकांची भूमिका इतिहासाने कधी विचारात घेतलेली नाही. राजा, त्याचं कुटुंब, वंश, त्याचं यश, जय-पराजय आणि कामकाज, हाच इतिहास असतो. कधी कोणी समजूनच घेतलेलं नाही, की त्या वेळचे लोक काय करत होते. राजाच्या प्रत्येक गोष्टीचं वर्णन केलेलं असतं पण तो जिचा राजा असतो, त्या त्याच्या प्रजेचा कुठेच उल्लेख नसतो. फक्त वेगवेगळया संस्कृतींच्या इतिहासामध्ये लोकांचा उल्लेख आढळतो. ते पण अशामुळे, की एक तर तेव्हा राजेच नव्हते किंवा फारच कमी प्रमाणात होते.

इतिहासलेखनाच्या या जनविरोधी वृत्तीविरुद्ध खरे तर खूप तक्रारी आहेत. मला स्वत:लाही वाटत असे, की वेगवेगळया काळात लोक कसे रहात होते, ते सांगणारा इतिहास का बरं लिहिला जाऊ नये. त्यांचं सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जीवन कसं होतं? त्यांच्या आचारविचारांमध्ये काळाबरोबर कसे बदल होत गेले? म्हणजे इतिहासाचे केंद्र राजसत्तेव्यतिरिक्त त्या काळच्या लोकांवर का असू नये?

या शिवाय, आणखी एका गोष्टीशी मी असहमत होतो; ती म्हणजे नेहमी उत्तर भारताचा इतिहासच बघितला जाणे. सुरूवातीला जरी, राजकीय घटनांचं केंद्र मुख्यत्वेकरून उत्तर भारत राहिला होता, तरी याचा अर्थ असा नाही, की दक्षिणेला किंवा उत्तर-पूर्व दिशेला काही घडतच नव्हतं. दक्षिण आणि उत्तर-पूर्व दिशांपासून इतिहास शिकवायला सुरुवात का बरं करू नये? हा मुद्दा सामाजिक शास्त्र विषयाच्या अध्यापन प्रशिक्षण कार्यशाळांमध्ये सुद्धा

निदर्शनाला आणला गेला होता. त्यावर अनौपचारिकरित्या थोडीफार चर्चासुद्धा झाली होती. परंतु कार्यक्रमपत्रिकेत आधीच ठरलेल्या कार्यक्रमांत ती कोठेतरी विरून गेली.

**एक होता राजा, एक होती राणी.......**

मुलांकडे पाहताना, आजची मुलं जरी नसली, तरी या आधीची सगळी मुलं राजाराणीच्या गोष्टी ऐकत असत. त्या बहुतेक करून काल्पनिक असत. त्यामुळे मुलांच्या मनामध्ये भूतकाळाबद्दल म्हणा किंवा इतिहासाबद्दल थोडीशी जिज्ञासा निर्माण होत असे.


'एक होता राजा, एक होती राणी....' या वाक्याने या सगळया गोष्टी सुरू होत असत. मग त्यात एक मंत्री असे, किंवा राजकुमार, राजकुमारी असत. राजा दुष्ट असे किंवा चांगला. मंत्री त्याच्या उलट. आणि गोष्ट पुढे चालू राही. पुढे त्यात अनेक लोक किंवा वेगवेगळया गोष्टी येत असत. जादुगार, राक्षस, साधू, उडता घोडा, वगैरे. या गोष्टींमध्ये एक काल्पनिक काळ असायचा. काही वेळा या गोष्टींमध्ये विक्रम-वेताळ, सिंहासन बत्तीशी पासून ते पौराणिक आख्यायिका सुद्धा असायच्या. या सगळयांमधून मुलांमध्ये भूतकाळाबद्दल एक प्रकारची जाणीव विकसित होत असे. मग त्या भूतकाळाचा बराचसा भाग काल्पनिक, बनावट आणि अतिरंजित का असे ना. या भूतकाळाच्या जाणिवेतून मार्ग निघायचा इतिहासाच्या जाणिवेचा.

**इतिहासाच्या धुक्याखाली लपलेलं सत्य**

असो, या एकलव्यच्या इतिहासाच्या पुस्तकामध्ये एक गोष्ट चांगली झाली आहे; ती म्हणजे इतिहासातून तारखा आणि राजे-नवाबांचं ओझं काढून टाकलं गेलं. मुलं आपल्या

देशाच्या, समाजाच्या भूतकाळाबद्दल अधिक माहिती करून तो समजून घेतील, असा प्रयत्न केला गेला आहे. जास्तीत जास्त पूर्णत्वाने. त्यामुळे, यांच्या उल्लेखातून बऱ्याचशा गोष्टी स्पष्ट होत आहेत. विशेष म्हणजे, त्यातल्या धड्यांमध्ये चित्रं, नकाशे वगैरे वापरून ज्या काही वेगवेगळ्या कृती करायला दिल्या होत्या, त्यामुळे मुलं सक्रिय तर राहातच होती, शिवाय त्यामुळे इतिहासाबद्दल एक आवश्यक अशी वस्तुनिष्ठ समज त्यांच्यामध्ये विकसित केली जात होती. तथापि, इतिहासातील वस्तुनिष्ठतेबद्दल वेगळ्या प्रकारचे वादविवाद होतच असतात. त्याचे निवारण करणे कठीण समजले जाते. इतिहासलेखनावर ज्याचे-त्याचे आग्रह-दुराग्रह आणि वेगवेगळे दृष्टिकोन सुद्धा परिणाम करतात. मधूनच इतिहासाच्या पुनर्लेखनाची मागणी सुद्धा केली जाते.

हा प्रश्न समजून घेण्यासाठी सातवीच्या इतिहासामधील सुलतान मोहम्मद तुघलकाने आपल्या राजधानीचे दिल्लीहून दौलताबादला केलेलं स्थलांतर, या घटनेकडे त्या वेळच्या दोन इतिहासकारांच्या नजरेतून बघण्याचा प्रयत्न केला गेला. जियाउद्दीन बरनी (*तारीख ए फिरुजशाही*) आणि एसामी (*फ़ुतूह-उस-सलातीन*) या दोन इतिहासकारांनी १३२८ सालामधल्या या घटनेचं एकदुसऱ्याच्या बरोबर उलट वर्णन केलेलं



*इ.७वी च्या इतिहासाच्या पुस्तकातील 'कैसे पता करें-क्या हुआ, क्या नहीं हुआ' या धड्यातील सुलतान मोहम्मद तुघलकाच्या राजधानीचे स्थलांतर दाखवणारे चित्र*

आहे. एकीकडे एसामी याने या घटनेचं ‘एक अव्यावहारिक योजना’ म्हणून वर्णन केलं आहे, तर बरनी याने याचं सहानुभूतीपूर्वक वर्णन करून, या घटनेला ‘एक चांगली फायदेशीर योजना’, असं म्हटलेलं आहे. असं करण्याची दोघांकडेही आपापली कारणं होती.

निश्चितच, इतिहासाच्या पुस्तकातील हा एक महत्त्वाचा धडा आहे. मुलांना राजधानीच्या स्थलांतराच्या घटनेची दोन वेगवेगळी वर्णनं वाचून खूप मजाही वाटली आणि शिवाय भूतकाळातील एखाद्या  घटनेच्या वास्तविकतेचा शोध घेणं किती कठीण काम असू शकतं, हेही समजलं. विशेषत:, जेव्हा पुरावे परस्परविरोधी असतात, तेव्हा. इतिहास समजून घेण्याच्या साधनांबद्दल प्रचलित पुस्तकांमध्ये माहिती दिलेली होती. पण, या साधनांच्या साहायाने सुद्धा खरं सत्य समजणं आणि अंतिमत: त्यावर काही बोलणं किती कठीण असू शकतं, यावर काहीही चर्चा केलेली नव्हती. त्याचबरोबर, या साधनांच्या सुद्धा आपापल्या मर्यादा असतात. आणि बऱ्याच वेळा ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये ‘अंतिम सत्य’ हा प्रश्न संशयास्पदच राहतो. नवीन शोध नेहमी जुन्या सत्याला पदच्युत करत असतात. तरीही, ते सत्य पूर्णपणे बाद होत नाही,  कोणत्या तरी स्वरूपात त्या सत्याचा उपयोग शिल्लक उरतोच. ही गोष्ट या धड्यातून उत्तमरीत्या स्पष्ट होते. इतिहास शिकायला सुरुवात करताना अशा प्रकारचा धडा शिकल्यामुळे मुलांमध्ये आवश्यक ती खबरदारी घेण्याची भावना निर्माण होऊ शकते.

## जुन्या वस्तू, पुस्तके आणि इमारतींमधून कळणारा इतिहास

हा धडा शिकवताना मी असं म्हटलं की, आपल्या घरात किंवा आजूबाजूला अशा बऱ्याच जुन्या गोष्टी असतात; जुनी भांडी, जुनं सामान, जुनी पुस्तकं. त्यातून आपल्याला

पूर्वीच्या काळाबद्दल काही ना काहीतरी माहिती मिळू शकते. मुलांनी ऐकलं, त्यावर थोडीफार बोलणं झालं आणि तास संपला. त्या नंतर दोन दिवसांनी एक मुलगा माझ्याकडे एक पुस्तक घेऊन आला.




***७ वी च्या इतिहासाच्या पुस्तकातील 'पुरानी इमारते' या धड्यातील एक चित्र***

*सिंधू संस्कृती नष्ट झाल्यानंतर बराच काळपर्यंत विटेऐवजी लाकडी किंवा मातीची घरे बांधली जात. लाकडी असल्यामुळे ही घरे आणि इमारती नष्ट झाल्या. त्यांचे खूप कमी अवशेष सापडतात. जे काही सापडले आहेत, त्यावरून लाकडी घर, भवतीचे कुंपण आणि कमान अशी दिसत असावी.*

"सर, माझ्या घरी एका जुन्या पेटीत हे पुस्तक होतं." पुस्तक माझ्या हातात देत तो म्हणाला. पुस्तकाची मधली काही पानं फाटली होती, पिवळी पडली होती. मोठ्या अक्षरांत छापलेलं छोटसं पुस्तक होतं ते. त्याला जुन्या कागदाचा वास येत होता. काहीसं ओळखीचं वाटत होतं ते पुस्तक. कव्हर पेज तर फाटलेलं होतं, पण पुढचं सुरक्षित होतं. ते पहिल्या इयत्तेचं हिंदीचं पुस्तक होतं. साल लिहिलं होतं, १९५६. माझ्या काळजात एकदम काहीतरी लकाकलं. पुस्तक मी परत एकदा चाळलं. मी स्वत: जेव्हा पश्चिम निमाड जिल्ह्यातल्या छोट्याशा ऊन गावातल्या शाळेत दुसरी-तिसरीत होतो, तेव्हाचं पुस्तक होतं ते. पुस्तक चाळताना काही धडे लगेच आठवले. 'नानांनी नानीला ओढलं. नानीने मुनियाला ओढलं. मुनियाने मुळा ओढला. मुळा जमिनीतून बाहेर आला.' अगदी असंच नाही, पण काहीसं असंच. चित्र सुद्धा आठवलं. आपल्या मळ्यातला मुळा ओढून काढणारी मुनिया. मुनियाला

ओढणारी नानी. पाहिलं, तर चित्रं अगदी तशीच होती. बाकीचे धडे सुद्धा. मला सारं काही एकदम आठवलं. तेव्हा वाचल्यानंतर, आत्ता कित्येक वर्षांनी ते पुस्तक मला दिसत होतं. पुस्तक माझ्या हातात होतं आणि मी ऊन गावातल्या शाळेच्या कोपऱ्यातल्या वर्गात बसलो होतो. खिडकीबाहेर बारीक पाऊस झुरमुरत होता. कुकडे सर शिकवत होते आणि मुनिया आपल्या शेतातून मुळा ओढून काढायचा प्रयत्न करत होती.




***सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकातील 'एक प्राचीन शहर - सीयडोणी' या धड्यातील एक चित्र.***

*सन ९०० च्या आसपास भारतात अशी अनेक शहरे होती. सीयडोणीसारखी काही नष्ट झाली, तर काही अजूनही शिल्लक आहेत. सीयडोणीमध्ये आता फक्त भग्नावशेष उरले आहेत, भग्न मंदिरे, विटा-दगडांचे ढिगारे आणि अनेक भग्न मूर्ती.*

अचानक मला सुचलं, की या जुन्या पुस्तकाचा उपयोग मुलांना इतिहासाची साधने शिकवण्यासाठी करावा. मग मी मुलांना त्या पुस्तकाद्वारे सांगितलं, की कसं हे पुस्तक आपल्याला सांगत आहे, की ४५-५० वर्षांपूर्वी लोक दुसरी-तिसरीच्या पुस्तकामधून काय शिकत होते. चित्रांमधून समजतं आहे, की तेव्हाचे लोक कसे कपडे वापरत होते, आपल्या सारखे की वेगळे. देण्याघेण्याचे पैसे कसे होते, वगैरे. मग मुलांनीही पुस्तक बघितलं. त्यांना ही गोष्ट थोडीशी समजली. वर्गात चर्चा सुरू झाली. "पूर्वीचे लोक..." आणि "पूर्वीच्या

काळी...”, त्यांच्या बोलण्यात हे शब्दप्रयोग ऐकू येत होते. आणि ती आपल्या घरांमध्ये मोठ्या माणसांकडून ऐकलेल्या गोष्टी आपल्या शब्दांत एकमेकांना ऐकवत होती.



***सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकातील 'एक प्राचीन शहर - सीयडोणी' या धड्यातील बाजाराचे चित्र***

*(एका शिलालेखात ९०६ सालच्या एका घटनेबद्दल लिहिले आहे, 'सीयडोणीचे मुख्य प्रशासक महासामंत उन्दभट याने सगळ्या अधिकार्यांना आदेश दिला - नारायण भटांच्या मंदिरातील पूजापाठाकरीता ही व्यवस्था केली जात आहे, की सीयडोणीच्या बाजारातून मंदिराला रोज सोन्याची काही नाणी दिली जातील. आकाशात जोपर्यंत चंद्र-सूर्य असतील, तोपर्यंत ही व्यवस्था कायम राहील. हे उन्दभट यांचे हस्ताक्षर आहे.')*

## इतिहास जाणून घेण्याची साधने

सामाजिक शास्त्राच्या पुस्तकामध्ये इतिहास जाणून घेण्याच्या साधनांचा परिचय पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीच्या धड्यांमध्येच दिलेला असतो. एकदाच. परंतु असं न करता या पुस्तकामध्ये वेगवेगळ्या धड्यांमधून या साधनांबद्दल माहिती दिलेली होती. सहाव्या इयत्तेच्या 'शिकारी मानव' या धड्यामध्ये कातळ चित्रे, दगडी हत्यारे आणि अवजारांची

माहिती दिली होती, तर 'अतिप्राचीन शहरे - सिंधूच्या खोऱ्यातील शहरे' या धड्यात उत्खननात सापडलेली खेळणी, घरांचे अवशेष, भांडी, मूर्ती इत्यादींची माहिती होती. 'राजा अशोक' या धड्यात शिलालेखांची माहिती होती. जुन्या नाण्यांची माहिती अनेक धड्यांमध्ये होती.

हे धडे शिकवताना असं जरूर वाटत होतं, की उत्खननात मिळालेल्या वस्तूंचं वय कसं ठरवलं जातं, याबद्दल मुलं प्रश्न विचारू शकतात. त्याबद्दल मी सांगावं की नको, ते मात्र मी ठरवू शकलो नव्हतो. असो.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १६० (सप्टेंबर - ऑक्टोबर २०२५) मधून साभार.*

§§§

---

**लेखक : प्रकाश कांत,** हिंदीमध्ये एम. ए. आणि पीएच डी. अनेक कथा, कादंबऱ्या, लेख प्रकाशित. ३० वर्षे ग्रामीण शाळांमध्ये अध्ययन.

**अनुवाद : संजीवनी आफळे**, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात कार्यरत.

**इ-मेल :** saaphale@rediffmail.com

**चित्रे :** एकलव्य द्वारा विकसित सामाजिक अध्ययन, म.प्र. पाठ्यपुस्तक निगम, कक्षा-७ वी मधून साभार. हा लेख एकलव्य द्वारा प्रकाशित पुस्तक 'सामाजिक अध्ययन नवाचार' मधून साभार.

***(कळीचे शब्द :- इतिहास, इतिहास लेखन, इतिहासाची पुस्तके, सामाजिक शास्त्र, इतिहासाची साधने, history, history books, tools to understand history, social sciences)***